**कृषि अवशेषांपासून ब्रिकेट / पेलेट / कांडी कोळसा संयंत्र उभारण्याच्या योजनेस मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

शासन निर्णय क्र.अपाऊ-२०११/प्र.क्र.१२०/ऊर्जा-७

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक:-२६ मार्च, २०१२.

संदर्भ:- १) शासन निर्णय क्रमांक-अपाऊ-२००७/प्र.क्र.५१०/ऊर्जा-७, दिनांक ११ सप्टेंबर, २००७.
२) पूरक पत्र क्रमांक-अपाऊ-२००७/प्र.क्र.५१०/ऊर्जा-७, दिनांक २७ फेब्रुवारी, २००९.

प्रस्तावना:-

कृषि अवशेषांपासून ब्रिकेट / पेलेट / कांडी कोळसा संयंत्र उभारण्याच्या योजनेस संदर्भातील दि.११ सप्टेंबर, २००७ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेमध्ये संदर्भातील दि.२७ फेब्रुवारी, २००९ च्या पूरक पत्रान्वये काही सुधारणा करण्यात आल्या. या सुधारणेमुळे सदर योजनेची अंमलबजावणी सन २००८-०९ या आर्थिक वर्षापर्यंतच सिमित झाली. तथापि, ग्रामीण भागातून या योजनेस मिळणारा प्रतिसाद व त्यामुळे होणारी उद्देशाची साध्यता विचारात घेता सदर योजना पुढेही चालू ठेवण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

ग्रामीण भागात कृषि अवशेषांचा उपयोग करुन ब्रिकेट / पेलेट / कांडी कोळसा इत्यादी निर्मिती करण्याच्या आणि त्याअनुषंगाने ग्रामीण भागात रोजगार निर्माण करणे या उद्देशाने संदर्भातील दि.११ सप्टेंबर, २००७ च्या शासन निर्णयान्वये सदर योजनेस प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असून, कृषि अवशेषांपासून ब्रिकेट / पेलेट / कांडी कोळसा संयंत्र उभारण्याची योजना सन २०११-१२ या आर्थिक वर्षापासून पुढे चालू ठेवण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. या योजनेसाठी लाभार्थीची निवड, या योजनेच्या अंमलबजावणीची पध्दत व या योजनेद्वारे दिले जाणारे आर्थिक सहाय्य, इत्यादी बाबी दि.११ सप्टेंबर, २००७ च्या शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे राहतील. तसेच

.... (कृ.मा.प.)

संदर्भातील दि.२७ फेब्रुवारी, २००९ च्या पूरक पत्रान्वये केलेल्या सुधारणा देखील सदर योजनेस लागू असून, सदर योजनेची सन २०११-१२ या आर्थिक वर्षापासून पुढे अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. याबाबतचा खर्च, "मागणी क्र.के-६, २८१० अपारंपारिक ऊर्जा साधने, ८०० इतर खर्च, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना राज्य योजना, (००) (०१) महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण" या लेखाशीर्षाखालून त्या-त्या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून भागविण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(सि.श.रानडे)

( सि.श.रानडे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, (महाऊर्जा)
२. सर्व जिल्हाधिकारी
३. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद
४. सर्व विभागीय आयुक्त.
५. महालेखापाल महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
६. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, सुत्रधार कंपनी मर्या., मुंबई.
७. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, वितरण कंपनी मर्या., मुंबई.
८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, निर्मिती कंपनी मर्या., मुंबई.
९. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, पारेषण कंपनी मर्या., मुंबई.
१०. खाजगी सचिव, मा.मंत्री (ऊर्जा)
११. खाजगी सचिव, मा.मंत्री, अपारंपारिक ऊर्जा
१२. खाजगी सचिव, सर्व मा.मंत्री व सर्व मा.राज्यमंत्री
१३. सर्व मंत्रालयीन विभाग
१४. ऊर्जा विभागातील सर्व कार्यासने
१५. निवडनस्ती / ऊर्जा-७, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.

------